# मांसाहारी प्राण्यांच्या व्यथा

डॉ. राजीव शारंगपाणी

डिस्कव्हरी चॅनेलमुळे प्राण्यांच्या जगातील अनेक सुखदुःखे अगदी जवळून अनुभवायला मिळतात. नुकताच चित्त्यांवर एक कार्यक्रम पाहण्यात आला. चित्त्याच्या मादीला आपल्या लहान पिल्लांचे भरण पोषण एकटीच्या हिमतीवर करावे लागते. कधी कधी तीन तीन पिल्लांना अंगावर पाजावे लागते. साहजिकच तिला शिकार करावी लागते. शाकाहारी प्राण्यांना कुठेही तोंड घातले की खायला मिळते तसे तिला करता येत नाही. फार ऊन असेल तर तिचे अंग फार तापत असल्याने तिला शिकार करणे जड जाते. त्यामुळे फार ऊन असताना ती शिकार करणे टाळते. त्यातून पाठलाग केल्यावर जर शिकार निसटली तर पुढील चाळीस मिनिटे तिला सावलीत बसून राहावे लागते ते इतके की जर का सिंह वगैरे प्राण्यांच्या ती दृष्टीस पडली तर त्यांच्या पासून जीव वाचविण्यासाठी पळणेही तिला शक्य होत नाही. शिकार जर मिळाली तर रानटी कुत्री किंवा तरस हे तिच्या मागावर असल्याने त्यांनी हल्ला केला तर तिला ती शिकार सोडून तिथून पळून जावे लागते. अशी अनेक अडथळ्यांची शर्यत असते. त्यातच चुकून भक्ष्याची लाथ बसली किंवा शिंग लागले तर मरण!!

तर ही चित्त्याची मादी शिकार करायला उठली की चालली असे करू शकत नाही. तिला आधी पिल्लांना लपवून ठेवावे लागते. कारण सिंह महाराजांना त्यांचा वास लागला की ते निर्दयपणे त्यांना ठार मारून टाकतात. पिल्ले लपवल्यावर मग भक्ष्य शोधायला ती सुरुवात करते. भक्ष्याच्या जवळात जवळ गेल्यावर अचानक हल्ला केला तर भक्ष्य मिळण्याची शक्यता वाढते. त्यामुळे ती अगदी जपून पावले टाकत एखाद्या नर्तकीसारखी जात राहते. जर कां तिथे चावट माकडे असतील तर ती ख्यॅक ख्यॅक असे आवाज करून हरणांना सूचना देतात मग हरणे पळून जातात.

तर त्या कार्यक्रमातल्या मादीने असा एक तरणाबांड काळवीट शोधला आणि ती त्याच्या मागे लागली. साधारण एक मिनिटापेक्षा कमीच अशा नागमोडी पाठलागानंतर ती त्या काळवीटाच्या जवळ आली आणि काळवीटाची मान पकडण्यासाठी तिने जो किरण साधला तो किंचित् चुकला आणि काळवीटाची शिंगे तिच्या मऊ पोटात घुसली. तिचा कोथळा बाहेर आला. अत्यंत दुःखात ती जागीच उभी राहिली. आतडी तिच्या अंगाबाहेर लोंबत होती. समालोचक सांगत राहिला आता ही हालहाल होऊन मरेलच पण त्याचबरोबर तिची तिन्ही पिल्ले मरतील. एक कुटुंब नामशेष होईल.

मांसाहारी प्राण्यांची दुःखे अशी भयानक असतात. वर उल्लेखिलेली इजा ही फार भयानक आहे पण साध्यातल्या साध्या दुखापतीने मांसाहारी प्राणी भुकेकंगाल होऊन मरून जातो. प्राण्यांचा पाठलाग करताना काटा जर पायात घुसला तर लंगडणाऱ्या कोणत्याही मांसाहारी प्राण्याला खायला मिळत नाही. क्वचित् सिंहांच्या कळपात उरलेसुरले खायला मिळू शकते. शाकाहारी प्राण्यांना खूर असल्याने त्यांना काटे बोचणे वगैरे काही होत नाही.

नुसते पाऊल मुरगळले तरी लंगडायला लागल्याने भक्ष्याचा पाठलाग करता येत नाही. मग खायला मिळत नाही. मुरगाळलेले पाऊल समजा दोन आठवड्यात आपले आपण ठीक झाले तरी तोपर्यंत इतका अशक्तपणा आलेला असतो की पाठलाग करण्याचे त्राण उरलेले नसते. म्हणजे पाऊल मुरगाळले तरी मृत्यू ओढवतो. डॉक्टर वगैरे चैन नाही.

हे कमी आहे म्हणून वाघ जेव्हा एखाद्या काळवीटाचा पाठलाग करतो तेव्हा काय होते ते अगदी अभ्यास करण्यासारखे असते. वाघ जेव्हा त्या काळवीटाच्या मागे लागतो तेव्हा काळवीट अचानक दिशा बशा बदलतो. वाघाचा मोमेंटम फार असल्याने तो फाफलत पुढे जातो परत वळून पाठलाग चालू करतो तोपर्यंत

काळवीट खूपच पुढे गेलेला असतो. जवळ जाईपर्यंत काळवीट पुन्हा दिशा बदलतो. साधारण अडीच किलोमीटरचे वीस पाठलाग केल्यावर एकदा वाघाला खायला मिळण्याची शक्यता असते. काळवीट जणू दमलेल्या वाघाला खिजवत गवतात तोंड घालून शांतपणे चरू लागतात.

मगरी सारख्या वरकरणी अतोनात दुष्ट आणि क्रूर वाटणाऱ्या प्राण्याची तर फारच भयंकर परिस्थिती असते. मगरीचे तपमान हे वातावरणाच्या तपमाना प्रमाणे बदलत राहते. पाण्यात फार गार वाटायला लागले की तिला जमिनीवर उन्हात येऊ न पडावे लागते. शरीर जेव्हा पाण्याइतके गार असते तेव्हा तिला नीट दिसत नाही . त्यामुळे भक्ष्य जवळ असले तरी पकडता येत नाही. उन्हात पडल्यावर जर तपमान वाढल्यामुळे जर पाण्यात जायची वेळ आली असे तर भक्ष्य पकडायला झालेला थोडा विलंब तिच्या शरीराला सहन होत नाही मग भक्ष्य सोडून पाण्यात जावेच लागते. भक्ष्य जर काही मिनिटापेक्षा जास्त वेळ पाण्याबाहेर तग धरू शकले तर तिच्या तोंडाची पकड ढिली होऊ लागते. आणि हिसडा देऊन भक्ष्य पळून जाते. मगरीला इतके दात असले तरी त्या दातांनी तिला तुकडे करता येत नाहीत. त्यामुळे हिसडे देऊन अगर इतर मगरींच्या साहाय्याने ओढाताण करून भक्ष्याच्या चिंध्या पोटात गिळाव्या लागतात.

शाकाहारी प्राण्यांची कातडी मांसाहारी प्राण्यांपेक्षा अतिशय मजबूत असते. त्यांना खूर असतात. त्यांचे कळप प्रचंड मोठे असल्याने त्या मानाने कमी प्राणी मरतात. त्यांना आपले मिळवायला पाठलाग कधीच करावा लागत नाही. एकीकडचे खाणे संपले की चालत चालत ते दुसरीकडे जातात. मांसाहारी प्राण्यांना आपले भक्ष्य असेल तिथेच जावे लागते. शाकाहारी प्राण्यांची पिल्ले काही तासातच आपल्या आईबरोबर चालायला सुरुवात करतात. मांसाहारी प्राण्यांची पिल्ले सहा सहा महिने लपवून ठेवावी लागतात. मांसाहारी आईला आपल्या पिल्लाना काही काळ पूर्णपणे एकटे सोडून जावेच लागते. मग शिकार करून परत आल्यावर नाहीशी झालेली

पिले किंवा मेलेली पिले पाहण्याचे तिच्या नशीबी येते. शाकाहारी प्राण्यांची पिले सक्षम होईपर्यंत सतत आपल्या आईजवळ असतात. आई त्यांचे बरेच वेळा संरक्षण करू शकते.

मांसाहारी प्राणी आपला आपला प्रदेश आपल्याच भाईबंदांपासून जिवाच्या करारानेराखत असतात. एकमेकांना भयंकर इजा करतात आणि क्वचित ठारही मारतात. माणसात आणि मांसाहारी प्राण्यात किती साम्य आहे ते एव्हाना चाणाक्ष वाचकांच्या लक्षात आले असेलच. वर न सांगितलेली साम्यस्थळे म्हणजे माणूस आणि मांसाहा री प्राणी या दोघांना नखे असतात. दोघांचे डोळे एकाच पातळीवर असतात. शाकाहा री प्राण्यांचे दोन बाजूला असतात. मांसाहारी प्राणी आणि माणूस आपल्या खांद्यातून हात बाहेर वळवू शकतात. शाकाहारी प्राणी तसे करू शकत नाहीत. नरमादीच्या शरीरसंबंधात मांसाहारी प्राणी आणि माणूस भयंकर हिंसाचार करतात. शाकाहारी प्राण्यांच्यात एकदा नराने दुसऱ्या नराला पिटाळले की मादी संभोग करू देते. मांसाहारी माद्या नरावर जसे गुरकावतात ते पाहण्यासारखे असते.

माणूस हा शाकाहारी आहे असा आटापिटा करून सांगणारे समाजात कमी नाहीत. त्यासाठी बादरायण संबंधाने काही गोष्टी जणू काही सिध्द केल्यासारखेही काही शाकाहारी आतंकवादी बोलतात. मनुष्याचा हिंसाचार, त्याचे असुरक्षित आयुष्य, त्याचे शरीर, स्त्री पुरुष संबंधातला त्याचा हिंस्त्रपणा, त्याची असहाय पिल्ले, त्याचा क्रूरपणा, त्याला नसलेली शिंगे हे सारे तो मांसाहारी असल्याचे स्पष्टपणे दाखवते.

प्रत्येक प्राणी आपआपले आयुष्य "जीवो जीवस्य जीवनम्" ह्या उच्च तत्वानुसार काढत असताना शाकाहाराचा अतिरेकी पुरस्कार करणारे क्षुद्र तत्वे प्रतिपादन करीत असतात. अशा वेळी रेड इंडियन लोकांची प्रार्थना आठवते. अमेरिकेतील रेड इंडियन जमाती या कुरणावर चरणारे गवे मारून आपला उदरनिर्वाह करीत

असतात. अन्न संपुष्टात आले की त्यांची एक टोळी गवा मारण्यासाठी बाहेर पडते. त्यातील अनुभवी वरिष्ठ व्यक्ती  आज कोणता गवा मारायचा त्याचा संकेत आपल्या टोळीला देते.  टोळी फक्त त्याच गव्याचा पिच्छा पुरवते आणि त्याला ठार मारते.  ठार मारल्यावर सारे त्या गव्याभोवती गुडघे टेकून बसतात आणि त्यांची प्रार्थना म्हणतात. ती प्रार्थना अशी," हे प्राण्या !!! आज आमचा जीव वाचविण्यासाठी आम्ही तुझा जीव घेतला आहे. तुला खाऊन आमची शरीरे पुष्ट होतील. तुझ्या शरीराचे आमचे शरीर होईल. पण आम्ही तुला खात्री देतो की आम्ही मेल्यावर आमच्या देहाची जी माती होईल त्यात वाढणारे गवत खाऊन तुझी पोरेबाळे समाधानाने नांदतील."

विचाराचा केव्हढा आवाका आहे ? मांसाहारी आणि शाकाहारी प्राणी आपआपले नशीब घेऊन जन्माला आले आहेत. एकाला अमृत आहे ते दुसऱ्याला विष आहे. वाघाने केळी खाणे आणि बोकडाने कोंबडी खाणे गैर आहे, जगरहाटी विरूध्द आहे. आणि अगदी म्हणायचेच झाले तर मांसाहारी प्राण्यांचे आयुष्य अधिक कष्टप्रद आहे हे नक्की.

तळटीपः लेखक मुख्यत्वे शाकाहारी आहे.